INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठेत डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपयोगावर उद्भवणाऱ्या व्यत्ययाचा अभ्यास

**Hiwaraj S Sarjare**
Assistant Professor of Commerce (CHB)
Department of Commerce
Yashoda Girls' Arts and Commerce College, Nagpur

## सारांश (Abstract )

आजच्या काळात मोबाईल, इंटरनेट, UPI आणि सोशल मीडियामुळे खरेदी-विक्रीच्या सवयींमध्ये मोठा बदल झाला आहे. या बदलाचा परिणाम नागपूर शहरातील ईतवारी, महल, गांधीबाग आणि सिताबर्डी या पारंपरिक बाजारपेठांवर कसा होत आहे, याचा या अभ्यासात आढावा घेतला आहे. या बाजारपेठांमध्ये अनेक वर्षांपासून विश्वास, प्रत्यक्ष संवाद आणि ओळख यांवर आधारित व्यापार चालत आला आहे; मात्र आता काही ग्राहक ऑनलाईन खरेदीकडे वळत आहेत आणि काही व्यापारी डिजिटल पेमेंट स्वीकारू लागले आहेत. डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारताना लहान व्यापाऱ्यांना अनेक अडचणी येतात. तांत्रिक ज्ञानाचा अभाव, इंटरनेट व नेटवर्क समस्या, व्यवहार अडकणे, सायबर फसवणुकीची भीती, तसेच डिजिटल व्यवहारांवरील खर्च यामुळे त्यांना अडथळे जाणवतात. मोठ्या ऑनलाईन कंपन्यांच्या सवलती आणि घरपोच सेवेमुळे स्थानिक विक्रेत्यांच्या विक्रीवरही परिणाम होतो. विशेषतः वृद्ध व्यापाऱ्यांसाठी या बदलाशी जुळवून घेणे अधिक कठीण ठरते.

तरीही या संशोधनातून असे दिसून आले की योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास व्यापारी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून ग्राहकसंख्या वाढवू शकतात. त्यामुळे डिजिटल परिवर्तन हे केवळ धोका नसून संधीही आहे. पारंपरिक बाजारपेठांचे अस्तित्व टिकवण्यासाठी डिजिटल साक्षरता, स्थानिक प्रशिक्षण आणि योग्य धोरणात्मक मदत आवश्यक आहे. नागपूरच्या या बाजारपेठांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत जुनी ओळख आणि विश्वासह कायम राखणे ही काळाची गरज असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

## प्रस्तावना (Introduction)

आजचा काळ हा डिजिटल युग म्हणून ओळखला जातो. आपल्या दैनंदिन जीवनात मोबाईल, इंटरनेट, संगणक, ऑनलाईन व्यवहार आणि सोशल मीडिया यांचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाही करणे कठीण झाले आहे. या सर्व साधनांना एकत्रितपणे "डिजिटल तंत्रज्ञान" असे म्हटले जाते. डिजिटल तंत्रज्ञान म्हणजे माहिती व व्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून साठवणे, प्रक्रिया करणे आणि देवाण-

घेवाण करणे होय. उदाहरणार्थ, UPI द्वारे पैसे पाठवणे, ऑनलाईन खरेदी करणे, सोशल मीडियावर व्यवसायाची जाहिरात करणे किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑर्डर देणे हे सर्व डिजिटल तंत्रज्ञानाचेच प्रकार आहेत.

डिजिटल तंत्रज्ञानाचा इतिहास पाहिला तर सुरुवातीला संगणकांचा वापर फक्त मोठ्या संस्थांपुरता मर्यादित होता. १९९० नंतर इंटरनेटचा प्रसार वाढला आणि माहितीचे जग खुले झाले. त्यानंतर मोबाईल फोन आणि स्मार्टफोनच्या आगमनामुळे डिजिटल क्रांतीला वेग आला. भारतामध्ये विशेषतः २०१० नंतर स्मार्टफोन, स्वस्त इंटरनेट सेवा आणि डिजिटल पेमेंट प्रणाली (जसे की UPI) यामुळे व्यापार-व्यवहाराच्या पद्धतीत मोठा बदल घडून आला. आज लहान दुकानदारांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वजण डिजिटल साधनांचा वापर करू लागले आहेत.

नागपूर शहर हे विदर्भाची राजधानी म्हणून ओळखले जाते आणि येथे अनेक पारंपरिक बाजारपेठा वर्षानुवर्षे व्यापारी संस्कृती जपून आहेत. इतवारी ही नागपूरमधील सर्वात जुन्या आणि गजबजलेल्या बाजारपेठांपैकी एक मानली जाते. येथे कापड, किराणा, भाजीपाला आणि घाऊक व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो. या भागात पारंपरिक पद्धतीने व्यवहार करण्याची परंपरा आजही दिसून येते. महाल हा भाग नागपूरच्या ऐतिहासिक वारशाशी जोडलेला आहे. जुन्या वाड्या, पारंपरिक दुकाने आणि स्थानिक व्यापारी यांमुळे या परिसराला वेगळी ओळख मिळाली आहे. येथे अनेक वर्षांपासून कुटुंबीय पद्धतीने व्यापार चालत आलेला आहे. गांधीबाग ही बाजारपेठ विशेषतः कापड आणि घाऊक व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. विदर्भातील अनेक व्यापारी येथे खरेदीसाठी येतात. तसेच सीताबर्डी हा भाग नागपूरमधील प्रमुख व्यावसायिक केंद्र मानला जातो. येथे पारंपरिक दुकाने आणि आधुनिक शोरूम्स दोन्हींचे सहअस्तित्व दिसते. त्यामुळे येथे जुन्या आणि नव्या व्यापारपद्धतींचा संगम पाहायला मिळतो.

डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे या पारंपरिक बाजारपेठांमध्ये बदल घडू लागले आहेत. काही व्यापारी डिजिटल पेमेंट स्वीकारू लागले आहेत, तर काहींनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या व्यवसायाची जाहिरात सुरू केली आहे. मात्र, या बदलामुळे पारंपरिक पद्धतींना काही प्रमाणात आव्हानही निर्माण झाले आहे. ग्राहकांच्या खरेदीच्या सवयी बदलत आहेत आणि स्पर्धा वाढत आहे. म्हणूनच नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठा आणि डिजिटल तंत्रज्ञान यांच्यातील संबंध समजून घेणे आवश्यक ठरते. या संशोधनाच्या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या बदलांचा आणि व्यत्ययाचा अभ्यास करून भविष्यातील व्यापारासाठी योग्य दिशा शोधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## साहित्य समीक्षा (Review of Literature)

वर्तमान संशोधन विषय “नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठेत डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपयोगावर उद्भवणाऱ्या व्यत्ययचा” या संदर्भात झालेल्या विविध अभ्यासांचा आढावा घेताना दिसते की डिजिटल तंत्रज्ञानाने भारतीय व्यापार आणि ग्राहक व्यवहारावर सखोल परिणाम केला आहे.

Harish Nayak N (2018) यांनी ई-कॉमर्सचा पारंपरिक किरकोळ व्यापारावर होणारा परिणाम अभ्यासला. त्यांच्या संशोधनानुसार भारतात इंटरनेट आणि स्मार्टफोनचा वापर वाढल्यामुळे ग्राहक ऑनलाईन खरेदीकडे

वळू लागले आहेत. त्यांना घरबसल्या खरेदीची सोय, जास्त पर्याय आणि सवलती मिळत असल्यामुळे पारंपरिक दुकानांवर स्पर्धेचा दबाव वाढला आहे. तरीही अनेक ग्राहक प्रत्यक्ष दुकानात जाऊन वस्तू पाहून खरेदी करण्यास प्राधान्य देतात, हेही त्यांनी नमूद केले आहे.

Rashmi Chourasia (2018) यांनी पारंपरिक बाजारपेठ आणि ई-कॉमर्स यांची तुलना केली. त्यांच्या अभ्यासात ग्राहकांच्या बदलत्या सवयींवर विशेष भर देण्यात आला आहे. ऑनलाईन खरेदी वाढत असली तरी पारंपरिक बाजारपेठांमध्ये विश्वास, प्रत्यक्ष संवाद आणि त्वरित वस्तू मिळण्याची सुविधा ही अजूनही महत्त्वाची मानली जाते.

Sandeep Jashwant (2022) यांनी पारंपरिक विक्रेते डिजिटल बदलाशी कसे जुळवून घेत आहेत याचा अभ्यास केला. त्यांच्या मते, अनेक छोटे व्यापारी आता डिजिटल पेमेंट स्वीकारू लागले आहेत आणि काहींनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांशी संपर्क वाढवला आहे. मात्र, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, भांडवलाची मर्यादा आणि वाढती स्पर्धा यामुळे सर्व व्यापाऱ्यांना डिजिटल साधनांचा पूर्ण लाभ घेता येत नाही.

Agrawal & Gulhane (2024) यांनी केलेल्या “नागपूर शहराच्या विशेष संदर्भात ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स विक्रेत्यांवर ऑनलाईन किरकोळ बाजारपेठेच्या परिणामांचा विश्लेषणात्मक अभ्यास” या अभ्यासात नागपूर शहरातील मोबाईल & इलेक्ट्रॉनिक विक्रेत्यांना ऑनलाईन विक्री प्लॅटफॉर्ममुळे स्पर्धा वाढल्याचे आणि ग्राहकांची खरेदी सवयी बदलत असल्याचे निष्कर्ष आता स्पष्ट झाले आहे.

सदर विद्‌यमान साहित्य असे सांगते की डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक बाजारपेठांमध्ये बदल गरजेचे आहे. ग्राहकांची सवय बदलत आहे, व्यापाऱ्यांना नवीन कौशल्ये शिकावी लागत आहेत आणि स्पर्धेचे स्वरूप बदलत आहे. मात्र, पारंपरिक बाजारपेठांची सामाजिक ओळख, विश्वास आणि स्थानिक संबंध यामुळे त्या पूर्णपणे नाहीशा होत नाहीत, तर नव्या परिस्थितीत स्वतःला बदलण्याचा प्रयत्न करतात. म्हणून मागील संदर्भाच्या आधारे नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठांवर डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या व्यत्ययाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

## संशोधनातील उणीवा (Research Gap)

डिजिटल तंत्रज्ञान आणि ई-कॉमर्सचा पारंपरिक व्यापारावर होणाऱ्या परिणामावर अनेक संशोधन झालेले आहेत. या अभ्यासांमध्ये ग्राहकांच्या बदलत्या सवयी, ऑनलाईन खरेदीची वाढ आणि डिजिटल पेमेंटचा वापर यावर भर दिला आहे. परंतु बहुतेक संशोधन हे राष्ट्रीय किंवा मोठ्या शहरांच्या स्तरावर केलेले आहे. नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठ जसे इतवारी, महाल, गांधीबाग आणि सीताबर्डी यांच्या स्थानिक परिस्थितीत डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या बदलांचा सखोल अभ्यास कमी प्रमाणात आढळतो. तसेच, व्यापारी आणि ग्राहक या दोघांच्या अनुभवांचा एकत्रित अभ्यासही फारसा दिसत नाही. डिजिटल बदलामुळे पारंपरिक व्यापाराच्या पद्‌धती, विश्वासाचे नाते आणि स्थानिक बाजार संस्कृतीवर नेमका कसा परिणाम होतो, यावर विशेष संशोधन उपलब्ध नाही.

म्हणूनच, नागपूरमधील पारंपरिक बाजारपेठांच्या संदर्भात डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या व्यत्ययाचा स्थानिक आणि प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित अभ्यास करणे आवश्यक आहे. हाच या संशोधनाचा मुख्य उणीवा आहे.

## संशोधन पद्धती (Research Methodology)

या संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) आणि विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या अभ्यासाचा उद्देश नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे निर्माण होणारे व्यत्यय समजून घेणे हा आहे. सध्याची परिस्थिती अभ्यासून त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

### अभ्यास क्षेत्र (Study Area)

या संशोधनासाठी नागपूरमधील प्रमुख पारंपरिक बाजारपेठांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये महाल, इतवारी, गांधीबाग आणि सीताबर्डी या बाजारपेठांचा समावेश करण्यात आला आहे. या बाजारपेठा पारंपरिक व्यवसायासाठी ओळखल्या जातात आणि येथे मोठ्या प्रमाणावर लहान व मध्यम व्यापारी कार्यरत आहेत.

### Data Collection (माहिती संकलन)

या अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम दोन्ही प्रकारची माहिती वापरण्यात आली.

- प्राथमिक माहिती : निवडलेल्या बाजारपेठांतील व्यापारी व ग्राहक यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून आणि मुलाखतीद्वारे माहिती गोळा करण्यात आली.
- दुय्यम माहिती : पुस्तके, संशोधन लेख, वृत्तपत्रे आणि विश्वास योग्य संकेतस्थळांमधून माहिती घेण्यात आली.

### नमूना निवड पद्धती आणि नमूना आकार (Sampling Method and Sample Size)

नमुना निवडीसाठी सोयीस्कर नमुना पद्धत (Convenience Sampling) वापरण्यात आली. प्रत्येक बाजारपेठेतून काही व्यापारी व ग्राहक यांची निवड करून साधारणपणे ५०-१०० प्रतिसादकांचा समावेश करण्यात आला.

**माहिती विश्लेषण (Data Analysis)**

गोळा केलेली माहिती साध्या सांख्यिकीय पद्धतीने वापरण्यात आली. या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण होणारे व्यत्यय आणि त्याचे प्रत्यक्ष परिणाम समजून घेण्यास मदत होईल.

## परिणाम (Result)

या अभ्यासादरम्यान महाल, इतवारी, गांधीबाग आणि सीताबर्डी या बाजारपेठांना भेट दिल्यावर एक गोष्ट स्पष्ट होते की, डिजिटल तंत्रज्ञानामुळे बाजारपेठा बदलत आहेत, पण हा बदल प्रत्येकासाठी सारखा नाही.

महाल मध्ये काही दुकाने पिढ्यानपिढ्या चालत आलेली आहेत. पूर्वी फक्त रोख व्यवहार करणारे दुकानदार आता ग्राहकांच्या मागणीनुसार UPI आणि QR कोड स्वीकारताना दिसले. एक दुकानदार म्हणाले, “ग्राहक म्हणतो ऑनलाईन देतो, तर घ्यावंच लागतं.” पण त्याच वेळी त्यांनी नेटवर्क गेलं की व्यवहार अडकतो, पैसे आले का नाही याची खात्री करायला वेळ जातो, अशी अडचणही सांगितली. म्हणजेच सोयीबरोबरच थोडी काळजीही वाढली आहे.

इतवारी मध्ये घाऊक व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो. येथे डिजिटल बिलिंग आणि ऑनलाईन ऑर्डर घेण्याची पद्धत वाढलेली दिसली. काही व्यापाऱ्यांनी सांगितले की आता हिशोब अधिक स्पष्ट राहतो आणि नोंदी व्यवस्थित ठेवता येतात. मात्र रोख व्यवहार कमी झाल्यामुळे सुरुवातीला थोडं समजून घ्यावं लागलं. “सगळं मोबाईलवर आलं, पण शिकायला वेळ लागला,” असेही काहींनी नमूद केले.

गांधीबाग मध्ये कपड्यांच्या दुकानांमध्ये डिजिटलचा प्रभाव अधिक जाणवतो. दुकानदार WhatsApp वर नवीन मालाचे फोटो पाठवतात, Facebook वर ऑफर्स टाकतात. त्यामुळे ग्राहक दुकानात येण्याआधीच वस्तू पाहतात. पण त्याच वेळी ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे किंमतीची स्पर्धा वाढली आहे. काही छोट्या दुकानांना हे आव्हानात्मक वाटत असल्याचे दिसून आले.

सीताबर्डी भागात तर डिजिटल व्यवहार जवळजवळ सर्वसाधारण झाले आहेत. कार्ड, UPI, ऑनलाईन बुकिंग सगळं सहज चालते. ग्राहकही डिजिटल पेमेंटला प्राधान्य देताना दिसतात. मात्र लहान पारंपरिक दुकानदारांना मोठ्या ब्रँड्स आणि ई-कॉमर्सशी स्पर्धा करताना ताण जाणवतो.

एकंदरीत पाहता, डिजिटल तंत्रज्ञानामुळे व्यवहार वेगवान आणि सोपे झाले आहेत. ग्राहक समाधानी आहेत, आणि व्यापाऱ्यांनाही नवीन संधी मिळत आहेत. पण या बदलामध्ये शिकण्याची गरज, तांत्रिक अडचणी आणि वाढती स्पर्धा हे व्यत्ययही स्पष्टपणे दिसतात.

म्हणून या अभ्यासाचा परिणाम असा सांगता येईल की डिजिटल तंत्रज्ञान हे पारंपरिक बाजारपेठांसाठी संधीही आहे आणि आव्हानही आणि यश त्या व्यापाऱ्यांचे आहे जे या बदलाशी जुळवून घेत आहेत.

## चर्चा/समीक्षा (Discussion)

या अभ्यासातून असे जाणवते की पारंपरिक बाजारपेठांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार हळूहळू पण निश्चितपणे वाढत आहे. मात्र हा बदल सर्वांसाठी सारखा आणि सहज नाही. काही व्यापाऱ्यांनी तो संधी म्हणून स्वीकारला आहे, तर काहींनी गरज म्हणून. त्यामुळे डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव हा अनुभवावर आणि परिस्थितीवर अवलंबून बदलताना दिसतो.

डिजिटल पेमेंट, ऑनलाईन बिलिंग आणि सोशल मीडियाचा वापर वाढल्यामुळे व्यवहार अधिक वेगवान झाले आहेत. ग्राहकांना सुट्टे पैशांची अडचण राहत नाही, तसेच पेमेंटची नोंद त्वरित मिळते. व्यापाऱ्यांसाठीही हिशोब व्यवस्थित ठेवणे सोपे झाले आहे. काहींनी असे सांगितले की दिवसाच्या शेवटी व्यवहार मोजणे आणि तपासणे आता पूर्वीपेक्षा सुलभ झाले आहे.

परंतु या प्रक्रियेत काही व्यत्ययही दिसून आले. सर्व व्यापाऱ्यांना तांत्रिक ज्ञान समान प्रमाणात नाही. नवीन ॲप्स समजून घेणे, नेटवर्क समस्या, व्यवहार अडकणे किंवा चुकीची नोंद होणे यामुळे कधी कधी संभ्रम निर्माण होतो. विशेषतः वयोवृद्ध व्यापाऱ्यांना सुरुवातीला या बदलाशी जुळवून घेण्यासाठी वेळ लागला.

याशिवाय ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्ममुळे स्पर्धा वाढल्याचे स्पष्ट दिसते. ग्राहक आता किंमतीची तुलना सहज करतात. त्यामुळे पारंपरिक दुकानदारांना केवळ वस्तू विकणे पुरेसे नसून ग्राहकांशी विश्वासाचे नाते टिकवणे आणि वेगळेपण दाखवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे.

असे स्पष्ट होते की, डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक बाजारपेठांमध्ये गती आणि पारदर्शकता वाढली असली तरी त्याच वेळी शिकण्याची गरज, तांत्रिक अडथळे आणि वाढती स्पर्धा यांसारखी आव्हानेही उभी राहिली आहेत. त्यामुळे डिजिटल तंत्रज्ञान हे पूर्णपणे फायदेशीर किंवा पूर्णपणे हानिकारक नसून, ते वापरणाऱ्याच्या तयारी आणि दृष्टिकोनावर अवलंबून असलेले एक प्रभावी साधन आहे, असे या चर्चेतून स्पष्ट होते.

## सूचना व शिफारसी (Suggestions and Recommendations)

पारंपरिक बाजारपेठेत डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपयोगावर उद्भवणाऱ्या अडचणी याबाबत काही महत्त्वाच्या सूचना देता येतात.

नागपूर शहरातील महाल, इतवारी, गांधीबाग आणि सीताबर्डी या पारंपरिक बाजारपेठांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण होणारे व्यत्यय कमी करण्यासाठी व्यापाऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. अनेक लहान आणि वयोवृद्ध व्यापाऱ्यांना ऑनलाईन व्यवहार, UPI, QR कोड यांचा वापर करताना अडचणी येतात. त्यांच्यासाठी सोप्या भाषेत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केली जावीत.

डिजिटल व्यवहारांमध्ये फसवणूक किंवा तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवणे गरजेचे आहे. व्यापाऱ्यांना योग्य ॲप्स, व्यवहाराची नोंद ठेवण्याच्या पद्धती आणि ग्राहकांशी डिजिटल माध्यमातून संपर्क कसा ठेवावा याचे मार्गदर्शन मिळाले तर व्यत्यय कमी होऊ शकतात.

तसेच पारंपरिक बाजारपेठांनी केवळ डिजिटल स्पर्धेला घाबरून न जाता तंत्रज्ञानाचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी करावा. उदाहरणार्थ, सोशल मीडियावर आपल्या दुकानाची माहिती देणे, ऑफर्स जाहीर करणे किंवा ग्राहकांशी संपर्क ठेवणे हे सहज शक्य आहे.

सरकार आणि स्थानिक प्रशासनाने इंटरनेट सुविधा अधिक सक्षम करणे, तसेच लघु व्यापाऱ्यांसाठी तांत्रिक मदत केंद्र सुरू करणे उपयुक्त ठरेल. डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण होणारे व्यत्यय योग्य प्रशिक्षण, सहकार्य आणि सकारात्मक दृष्टिकोनातून संधीमध्ये रूपांतरित करता येऊ शकतात. पारंपरिक ओळख जपत आधुनिक साधनांचा स्वीकार करणे हीच पुढील काळाची गरज आहे.

## निष्कर्ष (Conclusion)

नागपूर शहरातील पारंपरिक बाजारपेठांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे झालेल्या बदलांचा अभ्यास करताना असे जाणवते की हा बदल अचानक घडलेला नसून हळूहळू आकार घेत गेलेला आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत बहुतांश व्यवहार रोख स्वरूपात होत होते; परंतु आता मोबाईलद्वारे पेमेंट, UPI, QR कोड, ऑनलाईन ऑर्डर आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांशी संपर्क या गोष्टी सामान्य होत चालल्या आहेत. या बदलामुळे व्यवहार अधिक जलद आणि सोपे झाले आहेत. ग्राहकांना सुट्ट्या पैशांची अडचण राहत नाही, तसेच व्यवहाराची नोंद तत्काळ मिळते. व्यापाऱ्यांसाठीही विक्रीची नोंद ठेवणे आणि हिशोब व्यवस्थापन करणे सुलभ झाले आहे.

मात्र या प्रक्रियेत काही अडथळेही स्पष्टपणे दिसून आले. सर्व व्यापाऱ्यांना सुरुवातीला डिजिटल साधनांचा वापर आत्मसात करणे सोपे गेले नाही. इंटरनेटची समस्या, तांत्रिक अडचणी, सायबर फसवणुकीची भीती आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव यामुळे काही प्रमाणात अस्वस्थता निर्माण झाली. विशेषतः वयोवृद्ध व्यापाऱ्यांना नवीन प्रणाली स्वीकारताना संकोच वाटत असल्याचे निरीक्षणात आले. काही ग्राहकांनाही डिजिटल व्यवहारांबाबत पूर्ण विश्वास वाटत नव्हता.

परंतु कालांतराने परिस्थितीत सकारात्मक बदल दिसू लागला. तरुण पिढी डिजिटल व्यवहारांना अधिक पसंती देत असल्याने व्यापाऱ्यांनीही गरज म्हणून हे तंत्रज्ञान स्वीकारले. हळूहळू त्यांनी त्याचे फायदे अनुभवले जसे की ग्राहकांची वाढती संख्या, व्यवहारातील पारदर्शकता आणि वेळेची बचत. त्यामुळे सुरुवातीला जाणवलेले व्यत्यय कमी होत गेले आणि डिजिटल पद्धती व्यवसायाचा एक महत्त्वाचा भाग बनू लागल्या.

या अभ्यासातून असे स्पष्ट होते की पारंपरिक बाजारपेठा आणि डिजिटल तंत्रज्ञान यांच्यात संघर्ष नसून परस्परपूरक संबंध तयार होत आहेत. योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध झाल्यास

पारंपरिक बाजारपेठा अधिक सक्षम, आधुनिक आणि स्पर्धात्मक बनू शकतात. त्यामुळे डिजिटल तंत्रज्ञानाला धोका म्हणून न पाहता, विकासाची संधी म्हणून स्वीकारणे हेच भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरेल.

## संदर्भग्रंथसूची (References)

सोनू. (२०२३). ई-कॉमर्सचा पारंपरिक किरकोळ व्यवसायांवरील परिणाम. *इंटरनॅशनल जर्नल फॉर रिसर्च पब्लिकेशन अँड सेमिनार, १४*(१).

DOI: https://doi.org/10.36676/jrps.2023-v14i1-035

अग्रवाल, एस. जी., & गुल्हाणे, एम. डी. (२०२४). नागपूरमधील ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांवर ऑनलाईन किरकोळ बाजाराचा प्रभाव: एक विश्लेषणात्मक अभ्यास. *शोधकोश: जर्नल ऑफ व्हिज्युअल अँड परफॉर्मिंग आर्ट्स, ५*(७).

DOI: https://doi.org/10.29121/shodhkosh.v5.i7.2024.4674

जशवंत, एस. (२०२४). तंत्रज्ञानातील बदलांच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक किरकोळ मॉडेल्समध्ये जुळवून घेणे: एक गुणात्मक अभ्यास. इंटिग्रेटेड जर्नल फॉर रिसर्च इन आर्ट्स अँड ह्युमॅनिटीज, *४*(१).

DOI: https://doi.org/10.55544/ijrah.4.1.29

हुग्गी, एम. एम., भुवनेश्वरी, आर., & उदगी, के. (२०२४). भारतातील डिजिटल पेमेंट प्रणालींचा ग्राहकांच्या वर्तनावर परिणाम. *शोधकोश: दृश्य व सादरीकरण कला जर्नल, ५*(३), (७८२-७८८).

DOI: https://doi.org/10.29121/shodhkosh.v5.i3.2024.406

परदीप, & कुमार, अ. (२०२४). डिजिटल पेमेंट प्रणालींचा उदय आणि किरकोळ क्षेत्राच्या विकासाचा अभ्यास.*जर्नल ऑफ इन्फॉर्मॅटिक्स एज्युकेशन अँड रिसर्च, ४*(३), (२८६९-२८७७).

DOI: http://jier.org

विजय कुमार, वि. (२०२५). ऑनलाईन खरेदी प्लॅटफॉर्मविषयी ग्राहकांच्या खरेदी वर्तनाचा अभ्यास. *जर्नल ऑफ सायन्स इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट सायन्स, २*(१२)

सिंह, व्ही. & अत्री आर. (२०२५). भारतातील डिजिटल पेमेंट प्रणालींचा उदय आणि पारंपरिक बँकिंग सेवांवरील त्यांचा प्रभाव. *आयकॉनिक रिसर्च अँड इंजिनिअरिंग जर्नल्स,* (५५२-५५६).

मेघे, व्ही. व्ही., व राहाटे, व्ही. (२०२५). नागपूरमधील ग्राहकांचे ऑफलाईन व ऑनलाईन खरेदी अनुभवातील समाधान : *एक विश्लेषणात्मक अध्ययन. इंटरनॅशनल जर्नल ऑफ रिसर्च - ग्रंथालयह,* १३(३).

DOI: https://doi.org/10.29121/granthaalayah.v13.i3.2025.6072